पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.विधी समिती
कार्यपत्रिका क्रमांक : १८
<u>सभावृत्तांत</u>

दिनांक : १९/३/२०१० वेळ : दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षीक सभा शुक्रवार दि.१९/३/२०१० रोजी दुपारी २.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे - सभापती
२. मा.एकनाथ मोटे
३. मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश
४. मा.खोमणे लता हनुमंत
५. मा.चौधरी अख्तरहुसेन तालुकदार

याशिवाय मा.देशमुख - सहा.आयुक्त,मा.काळे - नगरसचिव,मा.चिंचवडे - कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------------------

ठराव क्रमांक :- २७७ विषय क्रमांक :- १
दिनांक :- १९/३/२०१० विभाग : प्रशासन
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.स्मिता गुंजेकर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/२/कावि/३३३/१० दि.४.३.२०१०
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रस्तावात नमुद केलेल्या अ.क्र.१ व ४ ते ७ वरील कर्मचा-यांना त्यांचे नावासमोर नमुद केलेल्या प्रवर्गातुन पे बॅन्ड र.रु.५२०० - २०२०० ग्रेड पे र.रु. २८०० मध्ये वीजतंत्री या पदावर पदोन्नती देण्यास तसेच श्री.घुगे देवानंद विश्वासराव ऑपरेटर यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याच्या दिनांकापर्यंत किंवा ११ महिने मुदतीसाठी श्री.वणवे शंकर मारुती इले.मोटार पंप ऑपरेटर यांना भटक्या जमाती (ड) प्रवर्गातुन पे बॅन्ड र.रु.५२०० - २०२०० ग्रेड पे र.रु.२८०० मध्ये वीजतंत्री या पदावर तात्पुरत्या स्वरुपाची पदोन्नती देण्यास व श्री घुगे देवानंद

विश्वासराव यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्यावर त्यांना भटक्या जमाती (ड) प्रवर्गातुन पे बॅन्ड र.रु.५२०० - २०२०० ग्रेड पे र.रु.२८०० मध्ये वीजतंत्री या पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(बाळासाहेब उर्फ खंडूशेठ दगडू कोकणे)
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/९/कावि/ ४०२ /२०१०
दिनांक - २० / ३ /२०१० चे लगत

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.